शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता एकलव्य शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेबाबतचे डॉ. मोहन खताळ, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/२०३४९ दिनांक. २१ डिसेंबर, २०१८ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 231
दि. 31 JAN 2019

d:\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१
web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 20349
दि. २१/१२/२०१८

**परिपत्रक**

21 DEC 2018

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता एकलव्य शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे बाबत...**

संदर्भः- १. शासन निर्णय क्र. एससीएच/१०९५/(८१)/मशि-४, दि. ७/०२/१९९६
२. शासन निर्णय क्र. एससीएच २००३/(४०५/०३)/मशि-१, दि. ०५/०२/२००४
३. संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८, दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८, दि. २३.१०.१८, दि. २८.१०.१८, दि. १.१२.१८, दि. १०.१२.१८, दि. ११.१२.१८, दि. १३.१२.१८ व दि. १९.१२.१८ रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकलव्य शैक्षणिक योजनेद्वारे कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरीब बुध्दीमान विद्यार्थ्यांस शिक्षणासाठी रु. ५,०००/- इतके आर्थिक सहाय्य देण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन https://mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील संचालनालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महाडीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थी पात्रतेनुसार विविध शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरु शकतात, तथापि संबंधित विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्तीचे लाभ देण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योजनेचे Preference निवडताना काळजी घेण्यात यावी. (उदा. विविध पात्र शिष्यवृत्तीपैकी विद्यार्थ्यांना एकलव्य शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास संबंधित विद्यार्थ्यांनी एकलव्य शिष्यवृत्तीसाठी first preference देणे आवश्यक आहे.)

तसेच सन २०१७-१८ या वर्षी सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१८-१९ साठी नुतनीकरणाचा (Renewal) अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक असून, नुतनीकरणासाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी (Application ID सह) , योजनेचे शासन निर्णय, योजनेची सविस्तर माहिती या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत एकलव्य शिष्यवृत्ती योजनेसाठी प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेता, सदरचे प्रमाण हे अत्यल्प असून सदर योजनेची व्यापक प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१
web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 20348

दि. २१/१२/२०१८

**परिपत्रक**

21 DEC 2018

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे बाबत...**

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४०७/तांशि-४, दि. २२.०२.२०१८
३. संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८, दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८, दि. २३.१०.१८, दि. २८.१०.१८, दि. १.१२.१८, दि. १०.१२.१८, दि. ११.१२.१८, दि. १३.१२.१८ व दि. १९.१२.१८ रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन https://mahadbtmahait.gov.in या लिंकव्दारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील संचालनालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या योजनेसाठी अर्ज करणेसाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल मधील वसतिगृह माहिती (Hostel Details) मध्ये वसतिगृहात राहणारा (Hosteller) या ऑप्शनची निवड करुन माहिती भरणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित वसतिगृह / पेयींग गेस्ट तसेच भाड्याचे घर यामध्ये राहत असतील अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल मधील वसतिगृह माहिती मध्ये वसतिगृहात राहणारा (Hosteller) या ऑप्शनचा निवड करुन माहिती भरावी व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.

ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज भरलेला आहे किंवा भरणार आहेत, असे विद्यार्थी योजनेच्या पात्रतेनुसार डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा अर्ज भरण्यास पात्र आहेत. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना पात्रतेनुसार दोन्ही योजनेचे लाभ अनुज्ञेय आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर तसेच महाडीबीटी पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या योजनेसाठी प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेता, सदरचे प्रमाण हे अत्यल्प असून सदर योजनेची व्यापक प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.